**Maharashtra Public Universities Act, 2016**

99. (1) There shall be a University Students' Council as specified in clause (b) of sub-section (4), a university department Students' Council for the departments of the university and a college Students' Council for each conducted college or institution of the University and each affiliated college, to look after the welfare of the students and to promote and co-ordinate the extra-curricular activities of different student's associations for better corporate life. The Councils shall not engage in political activities.

(2) The University Department Students' Council shall consist of the following members, namely :

(a) President, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in all university departments ;

(b) Secretary, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in all university departments ;

(c) one lady representative, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in all university departments ;

(d) one representative belonging to Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (VimuktaJatis) or Nomadic Tribes or Other Backward Classes, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in all university departments;

(e) one student from each department, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that department ;

(f) one student each from (a) National Service Scheme, (b) National Cadet Corps, (c) Sports and (d) Cultural activities, nominated by the Vice-Chancellor from the students who are engaged in National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities, respectively, on the basis of prescribed criteria ;

(g) Director, Students' Development shall be an ex-officio member.

(3) The College Students' Council for each institution, conducted college or affiliated college shall consist of the following members, namely :

(a) President, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that college ;

(b) Secretary, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that college ;

(c) one lady representative, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that college ;

(d) one representative belonging to Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (Vimukta-Jatis) or Nomadic Tribes or Other Backward Classes, by rotation, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that college: Provided

that the University shall decide the category of reservation for each college for the purpose of this clause by drawing lots;

(e) one student from each class, elected by an electoral college consisting of students who are engaged in full time studies in that class;

(f) one student each from (a) National Service Scheme, (b) National Cadet Corps, (c) Sports and (d) Cultural activities, nominated by the Principal from the students who are engaged in National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities, respectively, on the basis of prescribed criteria ;

(g) one senior teacher as coordinator of the Students' Council appointed by the principal of the college and Director, Sports and Physical Education, NSS Programme Officer and NCC Officer as permanent invitees.

(4) (a) There shall be University Students' Association consisting of the following members, namely :

(i) Presidents of the University Department Students' Council and each College Students' Council ;

(ii) Secretaries of the University Department Students' Council and each College Students' Council ;

(iii) Lady representatives of the University Department Students' Council and each College Students' Council ;

(iv) Student representatives, belonging to Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (VimuktaJatis) or Nomadic Tribes or Other Backward Classes of the University Department Students' Council and each College Students' Council.

(b) The University Students' Council shall consist of the following members, namely :

(i) President, elected by the members of University Students' Association from amongst themselves ;

(ii) Secretary, elected by the members of University Students' Association from amongst themselves ;

(iii) one Lady Representative, elected by the members of University Students' Association from amongst themselves ;

(iv) one Representative belonging to Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes (Vimukta Jatis) or Nomadic Tribes or Other Backward Classes or Special Backward Category, by rotation, elected by the members of University Students' Association from amongst themselves ;

(v) one student each from (a) National Service Scheme, (b) National Cadet Corps (c) Sports and (d) Cultural activities nominated by the President of the University Students' Council in consultation with the Director, Students' Development from amongst the students of the University Departments and affiliated colleges who are engaged in National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities respectively on the basis of prescribed criteria ;

(vi) Director Board of Student Development, Director Sports and Physical Education, Director Board of Lifelong Learning and extension shall be permanent invitees.

(5) The first meeting of the University Students' Council shall be presided over by the Vice-Chancellor and shall be attended by such other officers as he may deem fit.

(6) A student shall be eligible to be, or continue to be, a member of any of the Students' Councils, only if he is enrolled as a full time student.

(7) During the period of election no person, other than a student on the rolls of college or institutions or University, shall be permitted to take part in the election process in any capacity. Any student or a candidate violating this condition shall be liable for disciplinary action against him in addition to the revocation of his candidature.

(8) The budget, frequency of meeting of the University Department Students' Council, Students' Council for each institution, conducted college or affiliated college and University Students' Council shall be as may be prescribed by the Statutes.

(9) The election of the student members of the Students' Councils shall be made every year, as soon as possible after the commencement of the academic year, on a date as may be prescribed. The term of office of the elected student members shall begin with effect from the date of election and shall extend up to the last day of the academic year, unless they have, in the meantime, incurred any of the disqualifications specified by or under the Act, and shall then expire.

(10) One third of the members of the Students' Council shall constitute the quorum. The procedure for conduct of business of the meetings and such other matters shall be such as may be prescribed by the Statutes. The Council shall meet at least once in every three months.

(11) The procedure for election, the powers and duties, authority for the conduct of election, mechanism for conduct of such elections, code of conduct for the candidates and election administrators and grievances Redressal mechanism in respect of such election shall be such as may be specified by the State Government, by orders published in the Official Gazette.

(12) The provisions of this sections shall come into effect from such date after issuing the order under sub-section (11), as specified by the State Government in such order.

९९. (१) पोट-कलम (४) चा खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल, व विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी विविध विद्यार्थी संघांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, विद्यापीठाच्या विभागांकरिता एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालय किंवा परिसंस्था आणि प्रत्येक संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता एक महाविद्यालय विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा कोणत्याही राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत.

(२) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :----

(क) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सभापती ;

(ख) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सचिव ;

(ग) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेली एक महिला प्रतिनिधी ;

(घ) सर्व विद्यापीठ विभागांमध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधून निवडण्यात आलेला एक प्रतिनिधी :

(ङ) त्या विभागामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणातून निवडून दिलेला प्रत्येक विभागामधील एक विद्यार्थी ;

(च) जे विद्यार्थी विहित केलेल्या निकषाच्या आधारावर अनुक्रमे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्ये यांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून कुलगुरुने नामनिर्देशित केलेल्या प्रत्येकी (क) राष्ट्रीय सेवा योजना (ख) राष्ट्रीय छात्र सेना (ग) क्रीडा आणि (घ) सांस्कृतिक कार्ये यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(छ) संचालक, विद्यार्थी विकास हा पदसिद्ध सदस्य असेल.

(३) प्रत्येक परिसंस्था, संचालित महाविद्यालय किंवा संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता असलेल्या महाविद्यालय विद्यार्थी परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :----

(क) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सभापती ;

(ख) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सचिव ;

(ग) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडून दिलेली एक महिला प्रतिनिधी ;

(घ) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे, त्यांच्यामधून आळीपाळीने अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधील एक प्रतिनिधी :

परंतु, विद्यापीठ या खंडाच्या प्रयोजनासाठी प्रत्येक महाविद्यालयाकरिता आरक्षणाचा प्रवर्ग चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करील ;

(ङ) महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांचा समावेश असणा-या निर्वाचक गणाद्वारे निवडून दिलेला प्रत्येक वर्गामधील एक विद्यार्थी ;

(च) विहित केलेल्या निकषाच्या आधारावर अनुक्रमे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्ये यांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्राचार्याने नामनिर्देशित केलेला (क) राष्ट्रीय सेवा योजना (ख) राष्ट्रीय छात्र सेना (ग) क्रीडा आणि (घ) सांस्कृतिक कार्ये यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(छ) महाविद्यालयाच्या प्राचार्याकडून नियुक्त केलेल्या विद्यार्थी परिषदेचा समन्वयक म्हणून एक वरिष्ठ अध्यापक आणि संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यक्रम अधिकारी आणि कायमस्वरूपी निमंत्रित म्हणून राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी.

(४) (क) पुढील सदस्यांचा समावेश असणारा एक विद्यापीठ विद्यार्थी संघ असेल :--

(एक) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांचे सभापती ;

(दोन) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्यके महाविद्यालय विद्यार्थी परिषद याचे सचिव ;

(तीन) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालयाची विद्यार्थी परिषद यांच्या महिला प्रतिनिधी

(चार) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालयाची विद्यार्थी परिषद यांच्यातील अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधील विद्यार्थी प्रतिनिधी.

(ख) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :--

(एक) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला सभापती ;

(दोन) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला सचिव ;

(तीन) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेली एक महिला प्रतिनिधी ;

(चार) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या विद्यार्थी सदस्यांनी त्यांच्यामधनू आळीपाळीने निवडून दिलला अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती, (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्यामधील एक प्रतिनिधी ;

(पाच) विहित निकषांच्या आधारावर अनुक्रमे जे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्ये यांमध्ये सहभागी झालेले आहेत अशा विद्यापीठ विभागांच्या आणि संलग्न महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांमधून संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी विचारविनिमय करून, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या सभापतीने नामनिर्देशित केलेला (क) राष्ट्रीय सेवा योजना, (ख) राष्ट्रीय छात्रसेना, (ग) क्रीडा व (घ) सांस्कृतिक कार्ये यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(सहा) विद्यार्थी विकास संचालक मंडळ ; संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण ; संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार हे कायमस्वरूपी निमंत्रित असतील.

(५) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु असेल आणि त्याला योग्य वाटतील असे इतर अधिकारी त्या बैठकीस उपस्थित असतील.

(६) कोणताही विद्यार्थी, जर त्याची/तिची पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(७) निवडणकुीच्या कालावधीमध्य ेमहाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या हजरेीपटावरील विद्यार्थी वगळता कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही नात्याने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. या शर्तीचे उल्लंघन करणारा कोणताही विद्यार्थी किंवा उमेदवार हा, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास त्याचबरोबर त्याची उमेदवारी रद्द केली जाण्यास पात्र असेल.

(८) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद, प्रत्येक परिसंस्था, संचालित महाविद्यालय किंवा संलग्न महाविद्यालय विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यांचा अर्थसंकल्प, बैठकीची वारंवारता ही परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल ;

(९) विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांची निवडणूक ही, प्रत्येक वर्षी, शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर विहित करण्यात येईल अशा दिनांकास घेण्यात येईल. निवडून आलेल्या विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा, दरम्यानच्या कालावधीत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर निवडणुकीच्या दिनांकापासून सुरू होऊन शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(१०) विद्यार्थी परिषदेच्या एक तृतीयांश सदस्यांनी बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीची कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. दर तीन महिन्यांतून किमान एकदा परिषदेची बैठक घेण्यात येईल.

(११) निवडणुकीची प्रक्रिया, अधिकार व कर्तव्ये, निवडणूक घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेणारी यंत्रणा, उमेदवार व निवडणूक प्रशासक यांच्यासाठी आचारसंहिता आणि अशा निवडणुकीच्या संबंधातील तक्रार निवारण यत्रंणा ही, राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(१२) या कलमाच्या तरतुदी ह्या, राज्य शासनाने पोटकलम (११) अन्वये आदेश काढल्यानंतर, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून अंमलात येतील.